खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

SPB
SHRI PISARNATH BROADBAND
श्री.संतोष अरविंद शेलार - उपनगराध्यक्ष, माथेरान, ८७९३३११०४४
संत गाडगे महाराज रोड, माथेरान रेल्वे स्टेशनच्या मागे
ता.कर्जत जि. रायगड (माथेरान) - ४१०१०२

वर्ष : ०५ | अंक : ३४०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.२१ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## दिल्लीतील आंदोलनाचे महाराष्ट्रात जोरदार पडसाद, पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेकडो तरुण जमले

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, पुणे :** दिल्लीत सुरु असलेल्या आंदोलनाचे जोरदार पडसाद महाराष्ट्रातही पडताना दिसत आहेत. म हाराष्ट्रात मुंबईत दादर येथील चैत्यभूमी परिसरात विद्यार्थ्यांनी आंदोलन करण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी आंदोलकांची धरपकड केली. पोलिसांनी आंदोलक तरुणांना ताब्यात घेतलं. तर याचवेळी पुण्यात शेकडो तरुण एकत्र जमले. या तरुणांनी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सीजेपीच्या समर्थनार्थ जोरदार आंदोलन केलं.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ विद्यार्थी एकत्र झाले. विविध विद्यार्थी संघटना या आंदोलनात सहभागी झाले. विद्यार्थ्यांकडून जोरदार घोषणाबाजी करण्यात आली आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली.

**शेकडो विद्यार्थ्यांचा आंदोलनात सहभाग...**

शेकडो विद्यार्थी या आंदोलनाला जमले आहेत. या आंदोलनाबाबत सोशल मीडियावर एकत्र येण्याचं आवाहन करण्यात आलं होतं. त्या अनुषंगाने विद्यार्थी जमले आहेत. तसेच विद्यार्थ्यांची संख्या आणखी वाढताना दिसत आहेत. त्यामुळे पोलिसांसमोर आव्हान वाढताना दिसत आहे.

**पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त !**

या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीसही जमले आहेत. कोणताही गैरप्रकार घडू नये यासाठी पोलिसांकडून काळजी घेतली जात आहे. दुसरीकडे आंदोलकांकडून जोरदार घोषणाबाजी केली जात आहे. आंदोलकांकडून टाळ्या वाजवून गाणीदेखील गायली जात आहेत. अनेकांच्या हातात वेगवेगळ्या प्रकारचे बॅनर आहेत. या बॅनरमधून



सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक आणि सीजेपीला पाठिंबा देण्याबाबत उल्लेख आहे.

**आंदोलक काय म्हणाले?**

शिक्षण व्यवस्थेत परिवर्तन झालं पाहिजे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचं माध्यम आहे. त्या माध्यमावर कुणी घाला घालत असेल तर आम्ही विद्यार्थी म्हणून हे कदापी सहन करणार नाहीत. कारण शिक्षणाने आपला विवेक जागृत होतो. शिक्षणाने राष्ट्राचं भलं आहे. त्याम ुळे शिक्षण व्यवस्था मजबूत, पारदर्शक असली पाहिजे, अशी आमची मागणी आहे, अशी प्रतिक्रिया एका आंदोलकाने प्रसारमाध्यमांना दिली. वारंवार पेपरफ ुटी होत आहेत. त्यामुळे केंद्र सरकारने शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेऊन शिक्षण व्यवस्था पारदर्शक करावी, अशीदेखील आमची मागणी आहे, असंदेखील आंदोलक यावेळी म्हणाले.

**राज्यभरात आंदोलनाचे पडसाद**

केवळ पुणेच नाही तर मुंबई, नागपूर, जळगाव अशा वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये विद्यार्थ्यांनी सीजेपीच्या समर्थनार्थ जोरदार आंदोलन केलं. तसेच दिल्लीत जोरदार घडामोडी घडत आहेत. सीजेपीचा मोर्चा हा संसद भवन परिसरात दाखल झाला आहे. तसेच दिल्लीत जंतरमंतर मैदानाचा परिसर पोलिसांनी खाली केला आहे. आजच्या आंदोलनावेळी पोलिसांनी आंदोलकांवर लाठीचार्ज केला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही त्याचे पडसाद उम टताना दिसत आहेत.

## तुकाराम महाराज पालखीचे सोलापूर जिल्ह्यात जल्लोषात स्वागत !





**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२०, पंढरपूर :** आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे प्रस्थान ठेवलेल्या श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याचे सोलापूर जिल्ह्यात आगमन होताच भक्ती, उत्साह आणि परंपरेचा अद्भुत संगम अनुभवायला मिळाला. सराटी-अकलूज येथे सोलापूर जिल्ह्याच्या सीमेवर जिल्हा प्रशासनाने पालखीचे अत्यंत भक्तिभावाने स्वागत केले. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी श्री संत तुकाराम महाराजांच्या पादुकांचे पूजन, अश्वपूजन करून पालखीचे स्वागत केले. जेसीबीमधून करण्यात आलेल्या पुष्पवृष्टीने संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला.

स्वागत सोहळ्यास मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पुणे पोलीस अधीक्षक संदीप सिंग गील, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, पंचायत समिती सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, उपजिल्हाधिकारी विजया पांगारकर, अमित माळी, सुमित शिंदे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश कोपूरवाड, उपमुख्य कार्यकारी अधिकारी सूर्यकांत भुजबळ यांच्यासह सोलापूर व पुणे जिल्ह्यातील अनेक अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

नीरा नदीवरील पूल ओलांडून पालखी रथाने सोलापूर जिल्ह्यात प्रवेश करताच जिल्हा प्रशासनाच्या वतीने जेसीबीमधून रथावर भव्य पुष्पवृष्टी करण्यात आली. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि 'ज्ञानोबा-तुकाराम' च्या अखंड जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तीमय झाला. हजारो भाविकांनी विठ्ठल नामाचा गजर करत पालखीचे जल्लोषात स्वागत केले.

पुणे जिल्ह्याचे उपजिल्हाधिकारी उत्तम दिघे यांनी पालखी सोहळ्याची जबाबदारी अधिकृतपणे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडे सुपूर्द केली. त्यानंतर पुणे जिल्ह्यातील विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या सोलापूर जिल्ह्यातील अधिकाऱ्यांकडे सोपवल्या. स्वागतस्थळी संध्याताई तिवाडी आणि त्यांच्या पथकाने सादर केलेल्या भारूडाने भक्तिरस अधिकच खुलवला. पादुकापूजनानंतर जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी स्वतः पालखी रथाचे सारथ्य करत वारकरी परंपरेप्रती आपली श्रद्धा व्यक्त केली. त्यांच्यासोबत मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन आणि पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांनी रथाचे सारथ्य केल्याने वारकऱ्यांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. या ऐतिहासिक स्वागत सोहळ्याला मराठी चित्रपट व दूरदर्शन क्षेत्रातील लोकप्रिय अभिनेते भाऊ कदम, अभिनेत्री शिवानी परब आणि संजना काळे यांनी उपस्थित राहून भक्तिभावाने पालखीचे दर्शन घेतले. त्यांच्या उपस्थितीमुळे भाविकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

स्वागतस्थळी जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांसाठी उभारलेल्या विविध सुविधांची माहिती पालखी सोहळा प्रमुखांना देण्यात आली. पिण्याचे शुद्ध पाणी, स्वच्छतागृहे, निवारा केंद्रे, हिरकणी कक्ष, मुख्यमंत्री आरोग्य रथ, आरोग्य उपचार केंद्र तसेच पालखीसोबत धावणारी आरोग्य बाईक यांसारख्या सुविधांचा हजारो वारकरी लाभ घेत असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

**अकलूजच्या रिंगण सोहळ्याने भक्तांच्या डोळ्यांचे पारणे फिटले**

अकलूज येथील सदाशिव माने विद्यालयाच्या भव्य मैदानावर पार पडलेला पारंपरिक रिंगण सोहळा हा दिवसाचा सर्वात आकर्षक क्षण ठरला. अश्वांनी घातलेल्या रिंगणाचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविकांनी गर्दी केली होती. 'याच देही... याच डोळा' हा अलौकिक सोहळा अनुभवताना अनेकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. टाळ-मृदंगाच्या निनादात आणि 'ज्ञानोबा-तुकाराम' च्या अखंड जयघोषात संपूर्ण अकलूज नगरी भक्तिरसात चिंब भिजून गेली. सोलापूर जिल्ह्यातील पालखी स्वागत सोहळ्याने वारकरी परंपरेचा गौरव, प्रशासनाचे उत्कृष्ट नियोजन आणि भक्तीचा महासागर यांचा अविस्मरणीय संगम घडवून आणला. पादुकापूजन, पुष्पवृष्टी, रथाचे सारथ्य आणि नेत्रदीपक रिंगण सोहळ्यामुळे हा दिवस आषाढी वारीतील संस्मरणीय पर्व ठरला.

## वनई–शिगाव रस्त्याची आ.राजेंद्र गावित यांनी घेतली तातडीची बैठक



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२०, पालघर :** वनई–हनुमाननगर–शिगाव रस्त्याच्या दुरवस्थेविरोधात ग्रामस्थांनी केलेल्या आंदोलनाची दखल घेत पालघर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेंद्र गावित यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन रस्त्याची त्वरित दुरुस्ती करण्याचे आदेश दिले. पावसाळ्यानंतर या मार्गावर सिमेंट काँक्रीटचा कायमस्वरूपी रस्ता उभारण्याचे निर्देशही त्यांनी बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांना दिले.

वनई ते शिगाव रस्ता दुरुस्तीसाठी १७ जुलै रोजी जोहार चौक येथे सामाजिक कार्यकर्ते ॲड. विराज गडग, सरपंच तसेच ग्रामस्थांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले होते. या आंदोलनानंतर आमदार राजेंद्र गावित यांच्या अध्यक्षतेखाली पंतप्रधान ग्राम सडक योजना, जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच बुलेट ट्रेन प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक पार पडली.


बैठकीस आंदोलनकर्ते ॲड. विराज गडग, सरपंच दीप्ती सुमडा, कामिनी जनाथे, गुलाब खरपडे, प्रदीप रिंजड, मधु चौधरी, बाबुराव खरपडे, कृष्णा सातपुते यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार गावित यांनी संबंधित अधिकाऱ्यांना रस्त्याच्या दुरवस्थेबाबत जाब विचारत तीव्र नाराजी व्यक्त केली. नागरिकांना होणारा त्रास लक्षात घेता तातडीने खड्डे बुजवून रस्ता वाहतुकीस सुरक्षित करावा तसेच पावसाळा संपताच सिमेंट काँक्रीटचा कायमस्वरूपी रस्ता उभारण्याची कार्यवाही सुरू करावी, असे आदेश त्यांनी दिले.

याशिवाय पालघर विधानसभा मतदारसंघातील इतरही खराब रस्त्यांची पाहणी करून त्यासाठी आवश्यक प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. एल अँड टीचे प्रकल्प संचालक इटा यांनाही याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यास सांगण्यात आले. संबंधित अधिकाऱ्यांनी एका आठवड्याच्या आत वनई–शिगाव रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती सुरू करण्याचे आश्वासन बैठकीत दिले.

बैठकीत सार्वजनिक बांधकाम विभाग, पंतप्रधान ग्राम सडक योजना, जिल्हा परिषद तसेच डहाणू व पालघर विभागातील विविध अभियंते उपस्थित होते. पालघर विधानसभा मतदारसंघातील रस्ते, पूल व अंतर्गत मार्गांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देशही आमदार राजेंद्र गावित यांनी सर्व संबंधित विभागांना दिले.

## नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या वतीने डोक्यावर मायेचे छत्र



**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.२०, माथेरान :** पावसाळ्यात नागरिकांना अचानक पावसाचा सामना करावा लागू नये तसेच त्यांच्या डोक्यावर मायेचे, आपुलकीचे आणि विश्वासाचे छत्र राहावे, या सामाजिक भावनेतून माथेरान नगरपरिषदेचे नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या वतीने मोफत छत्री वाटप उपक्रमाला सुरुवात करण्यात आली. श्रीराम मंदिर चौक येथे आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी, कामगार तसेच सर्वसामान्य नागरिकांना छत्री भेट देण्यात आली. हा उपक्रम केवळ पावसापासून संरक्षण देण्यासाठी नसून समाजाप्रती असलेली आपुलकी आणि सेवाभाव व्यक्त करणारा असल्याचे उपस्थितांनी सांगितले.

चंद्रकांत चौधरी यांचा राजकारणापेक्षा समाजकारणावर अधिक भर राहिला असून, गरजू नागरिकांच्या मदतीसाठी विविध सामाजिक उपक्रम ते सातत्याने राबवत असतात. त्याच सेवाभावी भावनेतून संपूर्ण माथेरानमधील नागरिकांना टप्प्याटप्प्याने मोफत छत्री वाटप करण्यात येणार असून, त्याची सुरुवात आज करण्यात आली. कार्यक्रमास शिवसेनेचे पदाधिकारी, नगरसेवक, युवासेना, महिला आघाडीच्या कार्यकर्त्या तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. या सामाजिक उपक्रमाचे नागरिकांनी स्वागत करत नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी यांच्या सेवाभावी कार्याचे कौतुक केले.

## पाटण नगरपंचायतीच्या समोरच कचऱ्याचे साम्राज्य ; रोगराईला खुलं आमंत्रण

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२०, पाटण :** पाटण ज्या नगरपंचायतीने संपूर्ण शहर स्वच्छ ठेवायचे, त्याच नगरपंचायतीच्या अगदी समोर कचऱ्याचे साम्राज्य उभे राहिले असेल तर शहराची काय अवस्था असेल? ही लाजिरवाणी अवस्था आहे पाटण शहराची. पाटण नगरपंचायत कार्यालयासमोर आणि लागूनच असलेल्या जुन्या बस स्थानक परिसरात गेल्या अनेक दिवसांपासून कचऱ्याचे ढीग साचले आहेत. वेळेवर कचरा न उचलल्याने तिथे दुर्गंधी, डास, कुत्री, यांचा सुळसुळाट झाला असून रोगराईला थेट निमंत्रण मिळाले आहे. यामुळे नागरिकांचे आरोग्य गंभीर धोक्यात आले असून नगरपंचायतीने हा कचरा तात्काळ उचलावा, अशी जोरदार मागणी होत आहे.

नगरपंचायतीच्या दारातच अस्वच्छतेचा कळस असल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

मुख्याधिकारी, नगराध्यक्ष ज्या गेटमधून रोज आत-बाहेर करतात, त्याच गेटच्या समोरचे हे विदारक चित्र आहे. कचऱ्याचा ढीग जुन्या बस स्थानकाच्या आवारात लागले आहेत. घरातील कचरा, हॉटेलचे वेस्टेज, प्लास्टिक, कुजलेली फळे, सगळं एकत्र. असल्याने उग्र



वास येत आहे. दुर्गंधीने श्वास गुदमरला:२० फ ुटांपर्यंत एवढी घाण वास येतो की, तिथून चालताना नाक दाबून जावे लागते. . मोकाट कुत्री, बसलेली असतात. रोगराईचे माहेरघर हाच कचरा कुजून त्यात अळ्या, माशा, डास तयार होत आहेत.नगरपंचायत म्हणते - शहर स्वच्छ ठेवा, कचरा घंटागाडीतच टाका. पण घंटागाडी ३ दिवस येतच नाही, . मग लोकांनी कचरा टाकायचा कुठे असा संताप स्थानिक नागरिकांनी केला. घंटागाडीच्या नियोजनाचा पूर्ण बोजवारा उडाला आहे. कर्मचारी वेळेवर येत नाहीत, घंटा गाड्यां नादुरुस्त आहेत अशी कारण सांगत आहेत. हा प्रकार म्हणजे 'दिव्याखाली अंधार' आहे. नगरपंचायतीच्या अधिकाऱ्यांना स्वतःच्या दारातला कचरा दिसत नसेल तर ते शहर स्वच्छ कसे ठेवणार? जुनं बस स्थानक हे पाटणचं मुख्य ठिकाण आहे. इथेच जर रोगराई पसरली तर संपूर्ण शहरात साथ येईल. मुख्याधिकाऱ्यांनी केबिनमधून बाहेर येऊन एकदा हा वास घ्यावा असा नागरिकांनी संताप व्यक्त केला.




## निसर्गाची अवकृपा की मानवाची चूक?

हल्ली एक वाक्य सर्वांच्या तोंडी ऐकायला मिळतेम णसांप्रमाणे निसर्गही बदलला आहे. हे वाक्य आजच्या परिस्थितीत तंतोतंत खरे वाटते. ऋतूंचे चक्र विस्कळीत झाले आहे. उन्हाळा अधिक तापदायक, हिवाळा अनियमित आणि पावसाळा पूर्णपणे बेभरवशाचा झाला आहे. त्यामुळे निसर्गाचा लहरीपणा दिवसेंदिवस वाढत असून त्याचे गंभीर परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागत आहेत.

पूर्वी हवामानाचा काहीसा निश्चित क्रम होता. जूनमध्ये पावसाची सुरुवात, ऑक्टोबरनंतर हिवाळ्याची चाहूल आणि मार्चपासून उन्हाळा असे ऋतुचक्र ठरलेले असे. परंतु आता कोणताही ऋतू वेळेवर सुरू होत नाही. जूनमध्ये पडणारा पाऊस उशिरा येतो, काही दिवस प्रचंड मुसळधार कोसळतो आणि त्यानंतर अनेक दिवस गायब होतो. दोन-तीन दिवसांत दोन महिन्यांच्या पावसाची सरासरी पूर्ण होते, तर पुढील अनेक दिवस कोरडे जातात. अशा असंतुलित पावसामुळे पूर, दरडी कोसळणे, पिकांचे नुकसान आणि जनजीवन विस्कळीत होणे ही नित्याची बाब झाली आहे.

पावसाळ्याप्रमाणेच उन्हाळाही अधिक तीव्र झाला आहे. अनेक भागांत तापमान ४० अंश सेल्सिअसच्या पुढे जात आहे. हिवाळाही पूर्वीसारखा राहिलेला नाही. थंडीचा कालावधी कमी झाला असून वातावरणात सतत अनिश्चितता निर्माण झाली आहे. हवामान खात्यालाही अचूक अंदाज वर्तविणे दिवसेंदिवस अधिक कठीण होत आहे. हे बदल केवळ भारतापुरते मर्यादित नसून संपूर्ण जगासमोर उभे राहिलेले गंभीर संकट आहे.

या परिस्थितीसाठी ग्लोबल वॉर्मिंग हे महत्त्वाचे कारण मानले जाते. पृथ्वीच्या सरासरी तापमानात सातत्याने वाढ होत असल्यामुळे हवामानाचे संतुलन बिघडत आहे. जागतिक हवामान तज्ज्ञांनीही भविष्यात ही समस्या अधिक गंभीर होण्याचा इशारा दिला आहे. मात्र यासाठी केवळ ग्लोबल वॉर्मिंगला दोष देऊन चालणार नाही. त्याम गे मानवी हस्तक्षेप आणि पर्यावरणाचा झालेला ऱ्हास हे तितकेच मोठे कारण आहे.

मानवाने विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रम णावर जंगलतोड केली, काँक्रीटची जंगले उभारली, औद्योगिकीकरणामुळे कार्बन उत्सर्जन वाढविले, वाहनांची संख्या वाढल्याने प्रदूषणात मोठी भर पडली आणि नद्या, नाले, तलाव व जलस्रोतांवर अतिक्रमण केले. नैसर्गिक संसाधनांचा बेसुमार वापर करून पर्यावरणाचे संतुलन बिघडविण्यात आले. परिणामी पृथ्वीचे तापमान वाढले आणि हवामानातील अनिश्चितता अधिक तीव्र झाली.

या बदलांचा सर्वाधिक फटका भारतातील शेतकऱ्यांना बसत आहे. भारत हा कृषिप्रधान देश असून मोठी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळे, पूर, कोरडा व ओला दुष्काळ याम ुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान होत आहे. शेती दिवसेंदिवस तोट्याची ठरत असल्याने अनेक तरुण गाव सोडून शहरांकडे स्थलांतर करत आहेत. त्यामुळे ग्रामीण भाग ओस पडत असून शहरांवरील लोकसंख्येचा ताण वाढत आहे. हवामान बदलाचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित नाही. मानवाच्या आरोग्यावरही त्याचे गंभीर परिणाम दिसून येत आहेत. श्वसनाचे विकार, उष्माघात, संसर्गजन्य आजार आणि इतर अनेक आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत. पशुपक्षी, वन्यजीव आणि जैवविविधतेलाही या बदलांचा मोठा फटका बसत आहे. अनेक प्रजातींचे अस्तित्व धोक्यात आले असून संपूर्ण जीवसृष्टीच या संकटाचा सामना करत आहे.

निसर्ग हा मानवाचा शत्रू नाही; तो आपल्या अस्तित्वाचा आधार आहे. परंतु मानवाने स्वार्थापोटी निसर्गाचा समतोल बिघडविल्यामुळे आज निसर्गाचे रौद्र रूप अनुभवावे लागत आहे. त्यामुळे पर्यावरण संरक्षण ही केवळ सरकारची नव्हे, तर प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, जलसंधारण, प्रदूषणावर नियंत्रण, प्लास्टिकचा कमी वापर, अक्षय ऊर्जेचा स्वीकार आणि नैसर्गिक संसाधनांचा संयमाने वापर ही काळाची गरज आहे.

आज निसर्ग सूड घेत नाही, तर आपल्या कृतींचे परिणाम आपल्यालाच दाखवत आहे. त्यामुळे विकास आणि पर्यावरण यांच्यात समतोल राखणे हीच खरी शाश्वत प्रगती ठरेल. जर आजही आपण हवामान बदलाच्या संकटाकडे गांभीर्याने पाहिले नाही, तर भविष्यात त्याची किंमत केवळ मानवालाच नव्हे, तर संपूर्ण जीवसृष्टीला मोजावी लागेल. आज पर्यावरणाचे संरक्षण केले, तर उद्या पर्यावरण आपले संरक्षण करेल; अन्यथा निसर्गाची अवकृपा ही येणाऱ्या पिढ्यांसाठी विनाशाची शोकांतिका ठरेल.

**- श्याम ठाणेदार**

# सीजेपीचे आंदोलन भरकटते आहे का ?

गेल्या काही दिवसांपासून दिल्लीतील जंतर मंतरवर चाललेले आंदोलन समस्त प्रसिद्धी माध्यमांची हेडलाईन बनले आहे. नीट पेपर फ ुटीनंतर कॉकरोच जनता पार्टीने देशाच्या विविध भागांत आंदोलने केली. ज्याला संमिश्र प्रतिसाद मिळाला. पेपर फुटीचे दायित्व घेऊन देशाच्या शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा या मागणीसाठी सोनम वांगचुक यांनी जंतर मंतरवर २० दिवस उपोषण केले ज्यामुळे संपूर्ण देशातील वातावरण ढवळून निघाले.

वृत्तपत्रांसह समाज माध्यमांवरही सरकारविरोधी प्रतिक्रिया उमटू लागल्या. वांगचुक यांचे समर्थन करण्यासाठी तरुणवर्ग मोठ्या प्रमाणात पुढे आला, विरोधी पक्षांनीही वांगचुक यांचे समर्थन केले, मात्र त्यानंतर सरकारने त्यात हस्तक्षेप करून वांगचुक यांना जंतर मंतर येथून उचलून रुग्णालयात हलवले. न्यायालयानेही आता याबाबतीत काही वेगळा निर्णय देण्यास नकार दिला आहे. जंतर मंतरवर चाललेल्या आंदोलनाला जसा जनतेचा पाठिंबा मिळत होता तशा तेथील काही वादग्रस्त बाबीही लोकांसमोर येत होत्या. विद्यार्थ्यांना न्याय मिळावा यासाठी सोनम वांगचुक एकीकडे उपोषण करत होते तर दुसरीकडे त्यांच्या सम र्थनासाठी आलेले काही तरुण क्रिकेट खेळत होते. मेजवान्या झाडत होते. मंचावर येऊन कुणीही काहीही बरळत होते. स्टॅन्ड अप कॉमेडियन कुणाल कामरा याने 'हे सरकार सीताच्या पतीचे नाव घेऊन नीताच्या पतीचे काम करत आहे' असे विधान करून हिंदूंचे आराध्य दैवत प्रभू श्रीरामांचा अवमान केला. हा अवमान होत असताना कॉकरोच जनता पार्टीचे अध्यक्ष अभिजित दिपके फिदीफिदी हसल्याने तो राग मनात ठेवून बरखा त्रेहन यांनी त्यांच्यावर पार्टीच्या कार्यकर्त्यांसमोरच शाई फ ेकली. त्यानंतर बरखा त्रेहन याना कॉकरोच जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांनी मारहाण करून त्यांचे केस ओढल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



याच मंचावर आणखी एका महिलेने एक पाकिस्तानी गीत सादर केले ज्याचे शब्द होते 'सब बूत उठ्वाए जायेंगे, बस नाम राहेगा अल्लाह का' ज्याचा अर्थ सर्व मुर्त्या हटवला जातील आणि केवळ अल्लाहचे नाव शिल्लक राहील. हे गाणे फैझ अहमद फैझ या पाकिस्तानी कवीने लिहिले आहे. या गाण्यावरून सुद्धा आता मोठा वाद निर्माण झाला आहे. हिंदुस्थानात जसे बहुसंख्येने हिंदू राहत आहेत तसे जैन आणि बौद्ध सुद्धा गुण्या गोविंदाने राहत आहेत. हिंदूंसह जैन आणि बौद्ध धर्मीय हे मूर्तिपूजक आहेत. या गाण्यातून या तिन्ही समाजाला एकप्रकारे आव्हानच देण्यात आले आहे. येणाऱ्या काळात देशातील सर्व मुर्त्या हटवल्या जातील आणि केवळ अल्लाहचे नाव या भारतात शिल्लक राहील हे गीत कॉकरोच जनता पार्टीच्या मंचावर म्हटले गेले ज्याला पार्टीच्या एकानेही विरोध केला नाही त्यामुळे हे गीत कॉकरोच जनता पार्टीचा भविष्यातील अजेंडा आहे कि काय अशी चर्चा आता जनमानसांत सुरु झाली आहे.

दिल्ली दंगलीतील आरोपी आणि उमर खालिदचे वडील सय्यद कासीम रसूल इलियास हे देखील यावेळी मंचावर उपस्थित होते. अभिनेता प्रकाश राज यांनीही याच मंचावरून वादग्रस्त विधान केले त्यामुळे जंतर मंतरवर सुरु असलेले कॉकरोच जनता पार्टीचे आंदोलन नक्की विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या सुरक्षेसाठी आहे की तरुणांची माथी भडकवण्यासाठी असा प्रश्न हिंदुत्ववादी आणि देशप्रेमी संघटनांकडून विचारला जात आहे. कुणाल कामरा, प्रकाश राज आणि पाकिस्तानी गीत गाणाऱ्या म हिलेच्याविरोधात हेट स्पीचचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी अनेक संघटनांनी केली आहे. वादग्रस्त लोकांना आपल्या मंचावर स्थान देऊन सामान्य जनतेचा रोष ओढवून घेणाऱ्या कॉकरोच जनता पार्टीचे भविष्य काय असणार आहे हे आता जनतेचाही हळहळू लक्षात येऊ लागले आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

# विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळू नका !

## केंद्रीय शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची आरपीआयची मागणी



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२०, नागपूर :** मागील काही महिन्यांत देशभरात NEET-UG, NEET-PG आणि UGC-NET सारख्या अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय परीक्षांमध्ये वारंवार होणारे पेपर लीक आणि गैरव्यवहार यांमुळे विद्यार्थी व पालकांमध्ये तीव्र संतापाची लाट आहे. या पार्श्वभूमीवर जंतर मंतर दिल्ली येथे सोनम वांगचुक व सीजीपीचे आंदोलन सुरू आहे.

मात्र, सोनम वांगचुक यांना दिल्ली पोलिसांनी जबरदस्ती अटक करून रुग्णालयात दाखल केले. या घटनेचा निषेध रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया खापरखेडा यांच्या वतीने करण्यात आला आहे. २० जुलै सोमवारला जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत राष्ट्रपतींना निवेदन पाठवण्यात आले असून केंद्रीय शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा घेण्याची मागणी निवेदनातून केली आहे.

निवेदनात परीक्षांमधील हा भोंगळ कारभार थांबवून शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी तातडीने उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. देशातील सर्वो च्च परीक्षांच्या आयोजनात झालेला सावळा गोंधळ हा विद्यार्थ्यांच्या भविष्याशी क्रूर खेळ असल्याचा आरोप आरपीआयने केला आहे. या आंदोलनात आरपीआयचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी निवेदन देताना पृथ्वीराज बागडे, राजेंद्र मेश्राम, दद्दू गणवीर, रवी शेंडे, त्रिशरण कुऱ्हाडे, अभिषेक शेंडे, भीमराव पाटील, सुमेध चव्हाण, प्रशांत पाटील, निखिल भिमगडे, अनिल धनवटे, राजू गुडदे, प्रवीण चव्हाण, राज देशभ्रतार, प्रितेश उके, आशिष सोमकुवर आदी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

> शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा
>
> वारंवार परीक्षा रद्द होणे आणि निकालांमधील गोंधळ यांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नैराश्याचे वातावरण असून, त्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालय ही संपूर्ण परिस्थिती हाताळण्यात पूर्णतः अपयशी ठरले आहे त्यामुळे नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मे द्र प्रधान यांनी आपल्या पदाचा तात्काळ राजीनामा द्यावा.
>
> **– धीरज देशभ्रतार**
> **सदस्य, चिचोली(खापरखेडा) ग्रामपंचायत व आरपीआय नेते**

### वारी तृषा

वारी घडो कधी तरी
तीव्र लागली रे तृषा
माहीत ना उरे किती
आपली आयुष्यरेषा

कैकदा ठरवले फक्त
जावू या पांडुरंगदेशा
इच्छापुर्ती मुळी नहो
झाकाळू गेल्या दिशा

पायांमध्ये शक्तीनाही
विचित्र वार्धक्य दशा
हरि मुख न्याहाळू बा
कशीअशी लागे नशा

किंतुपरंतु संपत नाही
दूर दूर पळवे आमिषा
साथ नाही रे शरीराची
मुरडघालतोयं आवेशा

नकार जितक्या वेळेस
अधिकवाढते चिकिर्षा
भिती उगाचं मरणाची
आमंत्रण देणारं मुमुर्षा

अवचित वारी सामील
फल स्वरूप मी उद्देशा
निश्चय केला आत्म्यांने
शिरसावंद्य हरिआदेशा

**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

# युरियाचा बफर स्टॉक शेतकऱ्यांसाठी खुला करा...

## रविंद्र राजदेव यांचे तालुका कृषी अधिकाऱ्यांना निवेदन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यात सध्या खरीप हंगाम सुरू असताना शेतकऱ्याला मात्र युरिया खत खरेदीसाठी हेलपाटे मारावे लागत आहे. तालुक्यातील शेतकऱ्यांना युरिया खताची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. खरीप हंगामात बाजरी, मका,सोयाबीन, भुईमूग इतर पिके वाढीच्या अवस्थेत असून त्यांना युरियाची अत्यंत गरज आहे. मात्र, युरीयाचा तुटवडा निम र्ण झाल्याने दुकाना बाहेर थांबून प्रतीक्षा करावी लागत आहे. त्यामुळे शासनाच्या ताब्यातील युरियाचा बफर स्टॉक तातडीने शेतकऱ्यांसाठी खुला करावा तसेच खतांची लिंकिंग व चढ्या दराने विक्री करणाऱ्या कृषीकेंद्रावर कडक कारवाई करावी अशी आग्रही मागणी निलेश लंके प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष टाकळी ढोकेश्वर गटाचे नेते रवींद्र राजदेव व तालुक्यातील शेतकऱ्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

पारनेर येथे उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांना व उपकृषी अधिकारी अलका गावडे यांना निलेश लंके प्रतिष्ठानच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी टाकळी ढोकेश्वर गटाचे नेते रवींद्र राजदेव, पै. संतोष जाधव, रविंद्र चौधरी आदींसह तालुक्यातील शेतकरी उपस्थित होते.

तालुक्यात सध्या निर्माण झालेला युरियाचा तुटवडा हा कृत्रिम नसून अनेक खत विक्रेत्यांकडे विक्रीसाठी युरियाचा साठाच उपलब्ध नाही. त्याम ुळे शेतकऱ्यांची मोठी गैरसोय होत आहे. तसेच, तालुक्यात युरिया उपलब्ध असल्याची चुकीची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत असल्याने संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे भविष्यात कृषी विभागाबाबत शेतकऱ्यांमध्ये नाराजी वाढण्याची शक्यता असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

> सध्या सुरू असलेल्या खरीप हंगामात बाजरी, मका, सोयाबीन व भुईमूग ही पिके तालुक्यात मोठ्या प्रमाणात घेतली जात आहे. त्यामुळे पारनेर तालुक्यात शासनाच्या साठ्यातील युरीयाचा बफर स्टॉक तातडीने खुला करून देणे गरजेचे आहे.
>
> कृषी केंद्रावरील गर्दी टाळण्यासाठी सेवा सोसायटी किंवा ग्रामपंचायतीमार्फत खतांचे वाटप करण्याचे नियोजन करावे तसेच खतांची चढ्या दराने विक्री लिंकिंग करणाऱ्या कृषी केंद्रांवर कडक कारवाई करावी. संबंधित विभागाने याबाबत स्पष्ट भूमिका घेऊन उपलब्ध बफर स्टॉकच्या वितरणास तातडीने मंजुरी द्यावी, अन्यथा निलेश लंके प्रतिष्ठान व शेतकऱ्यांच्या वतीने आंदोलनाचा इशारा देण्यात येत आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

# आ.जोरगेवार यांच्या पुढाकारातून विक्रमी रक्तदान

## १४ शिबिरांत १,०७० रक्तदात्यांचा सहभाग




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२०, चंद्रपूर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून चंद्रपूर विधानसभा मतदारसंघात देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह उत्साहात राबविण्यात येत आहे. १५ जुलैपासून सुरू झालेल्या या सेवा सप्ताहांतर्गत विविध सामाजिक, आरोग्य व जनकल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, मतदारसंघातील ५६ ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मळित असून, रविवारी आयोजित करण्यात आलेल्या १४ रक्तदान शिबिरांमध्ये विक्रमी रक्तदान झाले असून तब्बल १ हजार ७० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचा आदर्श घालून दिला. रक्तदान हे श्रेष्ठ दान मानले जाते. गरजू रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि रक्ताचा तुटवडा भासू नये, या उद्देशाने आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून सेवा सप्ताहात मोठ्या प्रमाणावर रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. युवक, महिला, सामाजिक कार्यकर्ते तसेच विविध संस्थांनी या उपक्रम ात उत्स्फूर्त सहभाग नोंदवित रक्तदान केले. रविवारी पाताळेश्वर मंदिर परिसर, भिवापूर, गुरुद्वारा, स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृह, वडगाव, घुग्घूस, विठ्ठल मंदिर वॉर्ड तसेच इतर विविध ठिकाणी रक्तदान शिबिरे पार पडली. प्रत्येक केंद्रावर नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान केले, त्यामुळे सर्वच शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. आ. किशोर जोरगेवार यांनी विविध शिबिरांना भेट देत रक्तदात्यांचे अभिनंदन केले. समाजासाठी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी सांगितले की, एका रक्तदात्यामुळे अनेक रुग्णांना नवजीवन मिळू शकते. समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी ओळखून नागरिकांनी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी होणे ही आनंदाची बाब असल्याचे त्यांनी नमूद केले.

१५ ते २३ जुलैदरम्यान सुरू असलेल्या देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह रक्तदान शिबिरांसह महाआरोग्य शिबिरे, योग शिबिरे, वृक्षारोपण, धार्मिक कार्यक्रम, दिव्यांग बांधवांना साहित्य वितरण, गुणवंत व उत्कृष्ट खेळाडूंचा सत्कार तसेच विविध जनकल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आ. किशोर जोरगेवार यांनी केले.

# पालशेतचे सुपुत्र ज्येष्ठ शाहिर सुधाकर गावणकर यांचे दुःख निधन



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२०, पालशेत (गुहागर) :** कोकणातील लोककला जपणारे आणि समाजप्रबोधनासाठी आयुष्य वाहून घेणारे गुहागर तालुक्यातील पालशेत गावचे सुपुत्र, ज्येष्ठ शाहिर सुधाकर रामचंद्र गावणकर यांचे दिनांक १८ जुलै २०२६ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने कोकणातील लोककला क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. गेली ३० ते ३४ वर्षे ते शाहिरी लोककलेच्या माध्यम ातून समाजप्रबोधनाचे कार्य करत होते. नमन आणि कलगी तुरा लोककलेसाठी त्यांनी अनेक काव्यलेखन करून ते स्वतः गायले देखील. चंडिकेच्या मंदिरात चार बळी, औदसेचा फेरा, लक्ष्मी औदसा,ही त्यांनी लिखित केलेली वगनाट्य खूप गाजली अशी अनेक वग नाट्य व लोकगीते त्यांच्या लेखणीतून आणि आवाजातून रेकॉर्डिंग कॅसेट माध्यमातून रसिकांपर्यंत पोहोचली आहेत. मुंबई रंगमंचावर तसेच कोकणातील विविध ठिकाणी त्यांनी जवळपास दोन दशके कलगी तुऱ्याचे कार्यक्रम सादर केले. कलानिकेतन नृत्य कलापथक झिंबरवाडी - पालशेत, सहकारी कला पथक - निवोशी (भेलेवाडी) सह विविध संस्थेच्या वतीने स्व.शाहीर सुधाकर गावणकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे.

# फील फाऊंडेशनतर्फे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप




**अक्षरज : अभिनव येलवे**

**दि.२०, मानखुर्द (मुंबई) :** फील फाऊंडेशन या सामाजिक संस्थेच्या वतीने मानखुर्द येथील मंडाला शिवनेरी वस्तीतील्या परिसरातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांना वह्या, पेन्सिल असे शैक्षणिक साहित्य देण्यात आले. फील फाऊंडेशन ही शिक्षण, आरोग्य, बालसुरक्षा आणि क्रीडा या विषयांवर कार्य करणारी सामाजिक संस्था आहे. संस्थेने मुलींसाठी मोफत फुटबॉल कोचिंग सुरू केले असून, विद्यार्थ्यांना शिक्षणातील अडचणी दूर करण्यासाठी मोफत स्टडी क्लासेस देखील सुरू केले आहेत.

या माध्यमातून वंचित आणि दुर्बल घटकांतील मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संस्था सातत्याने कार्यरत आहे. या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्यात आले तसेच नियमित शिक्षण घेऊन स्वतःचे आणि समाजाचे भविष्य घडविण्याचे आवाहन करण्यात आले. मुलांना केवळ उद्याचे नव्हे तर आजचेही सर्जनशील, जबाबदार आणि सुशिक्षित नागरिक बनविणे हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

याप्रसंगी फील फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष राकेश वाघमारे म्हणाले, सम ाजातील प्रत्येक मुलाला शिक्षणाचा अधिकार मिळाला पाहिजे. आर्थिक परिस्थितीम ुळे कोणतेही मूल शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी फील फाऊंडेशन सातत्याने कार्य करत आहे. शिक्षण, क्रीडा आणि बालसुरक्षा या माध्यमातून मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

या उपक्रमाचे स्थानिक नागरिक, पालक आणि विद्यार्थ्यांनी स्वागत केले असून संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. फील फाऊंडेशन भविष्यातही अशाच विविध सामाजिक उपक्रमांद्वारे गरजू मुलांच्या विकासासाठी कार्यरत राहणार असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले.

# पीक विम्याच्या प्रश्नावर देवगाव येथे 'सरण आंदोलन' सुरू

## प्रशासनासमोर शेतकऱ्यांचा एल्गार, ठोस निर्णयाशिवाय माघार नाही!

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.२०, देवगाव (नाशिक) :** देवगाव महसूल मंडळातील खरीप २०२५ हंगामातील प्रलंबित पीक विमा दाव्यांच्या प्रश्नावर प्रशासनासोबतची चर्चा निष्फळ ठरल्यानंतर शेतकरी बचाव कृती समितीच्या वतीने सोम वार, दि. २० जुलै रोजी देवगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात तीव्र'सरण आंदोलन'सुरू करण्यात आले. पीक विम्याची हक्काची रक्कम प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही, असा ठाम निर्धार आंदोलकांनी व्यक्त केल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे ठाकले आहे.



**आश्वासनांवर समाधान नाही; थेट मैदानात**

यापूर्वी निफाड तहसील कार्यालयात तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्या उपस्थितीत शेतकरी प्रतिनिधी आणि प्रशासनाची बैठक पार पडली होती. या बैठकीत प्रलंबित दावे मंजूर करण्याबाबत शासनाकडे केवळ प्रस्ताव पाठविण्याचे आश्वासन देण्यात आले होते. मात्र, अशा पोकळ आश्वासनांवर समाधान मानण्यास नकार देत शेतकऱ्यांनी पूर्वघोषित कार्यक्रम ानुसार आज ग्रामपंचायत कार्यालयासम ोर प्रतीकात्मक सरण उभारून आंदोलनाला सुरुवात केली. खरीप २०२५ मध्ये अतिवृष्टीमुळे सोयाबीन, मका, टोमॅटो आणि इतर पिकांचे ७० ते ९० टक्क्यांपर्यंत अतोनात नुकसान झाले होते. परंतु, विमा कंपनीने सदोष पीक कापणी प्रयोग, चुकीचे पंचनामे, हवामान केंद्राच्या त्रुटीपूर्ण नोंदी आणि अन्यायकारक निकषांचा आधार घेत हजारो शेतकऱ्यांचे दावे फेटाळून लावले आहेत. या अन्यायाविरोधात आंदोलनस्थळीविमा आमच्या हक्काचा, नाही कुणाच्या बापाचा!आणिपीक विमा मिळालाच पाहिजे!अशा जोरदार घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

**प्रतीकात्मक सरणावर बसून निषेध**

या आंदोलना दरम्यान मनोहर बोचरे, धनंजय जोशी, जयवंत लोहारकर आणि राजेंद्र मेमाणे हे शेतकरी स्वतः प्रतीकात्मक सरणावर बसून प्रशासनाचा व विमा कंपनीचा निषेध करत होते.या आंदोलनाला निर्भय महाराष्ट्र पार्टीचे जितेंद्र भावे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निवृत्ती गारे पाटील, सचिन होळकर, अशोक नागरे, शिवाजी सुपनर, डॉ. श्रीकांत आवारे, विनोद जोशी, भाऊसाहेब बोचरे, माणुसकी फाउंडेशनचे सागर निकाळे, भाऊसाहेब भवर, शिवा सुरासे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख निवृत्ती जगताप, प्रकाश घोटेकर, राजेंद्र पाटील यांच्यासह देवगाव महसूल मंडळातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**प्रशासनाची धावपळ; सायंकाळी जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक**

आंदोलनामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून उपविभागीय पोलिस अधिकारी कांतिलाल पाटील, तहसीलदार विशाल नाईकवाडे, तालुका कृषी अधिकारी सुधाकर पवार, लासलगावचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सागर कोते यांच्यासह महसूल, कृषी व पोलिस यंत्रणा आंदोलनस्थळी तैनात होती.अधिकाऱ्यांनी आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, परंतु शेतकरी आपल्या मागण्यांवर ठाम राहिले. अखेर परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तहसीलदार नाईकवाडे यांनी आंदोलकांचे जिल्हाधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून बोलणे करून दिले. त्यानंतरजिल्हाधिकाऱ्यांनी आज सायंकाळी ६ वाजता विशेष बैठकीचे आयोजन केले आहे.या बैठकीस जिल्हा कृषी अधिकारी माने, उपविभागीय पोलिस अधिकारी कांतिलाल पाटील, तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्यासह शेतकरी प्रतिनिधी उपस्थित राहणार असून, या बैठकीत काय तोडगा निघतो, याकडे संपूर्ण निफाड तालुक्याचे लक्ष लागले आहे.

**शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या :-**

- खरीप २०२५ मधील सर्व प्रलंबित पीक विमा दावे तातडीने मंजूर करून नुकसान भरपाई त्वरित खात्यात जमा करावी.
- सदोष पीक कापणी प्रयोगांची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करावी.
- देवगाव हवामान केंद्राच्या चुकीच्या नोंदींची चौकशी करून त्यात दुरुस्ती करावी.
- विमा कंपनीचे अन्यायकारक 'ट्रिगर' निकष रद्द करावेत.
- तालुकास्तरावर पीक विमा केंद्र सुरू करून विमा कंपन्यांना पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे.
- शासकीय पंचनामे आणि विमा कंपनीच्या निकषांतील विसंगती त्वरित दूर करावी.
- चुकीचे व दिशाभूल करणारे अहवाल सादर करणाऱ्या संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत.

# वारकऱ्यांची सेवा हीच विठ्ठलाची सेवा; परीते येथील अन्नछत्राला खा.लंकेच्या हस्ते सुरुवात



उपक्रमात उभारण्यात आलेल्या मंचावर दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार तसेच खासदार निलेश लंके यांचे जिवाभावाचे सहकारी, राजेंद्र चौधरी, बंडूजी साबळे यांच्या प्रतिमा ठेवून त्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या स्मृतींना उजाळा देऊन सेवाभावाची ही परंपरा पुढे नेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

---

वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून माणुसकी, समता आणि सेवाभावाची संस्कृती असल्याचा संदेश देत परीते येथील अन्नछत्रातून यंदाही हजारो वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलविण्याचा संकल्प केला आहे. चार दिवस चालणाऱ्या या सेवायज्ञात लाखो वारकऱ्यांना दिलासा मिळणार असून, विठ्ठलभक्तांच्या सेवेतून समाजकारणाचा एक प्रेरणादायी आदर्श उभा राहत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** आषाढी वारीच्या निमित्ताने विठ्ठलभक्तांच्या सेवेसाठी खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून उभारण्यात आलेल्या सोलापूर जिल्ह्यातील परीते येथील अन्नछत्राचा रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात शुभारंभ झाला.

नीलेश लंके प्रतिष्ठान आणि 'आपला मावळा' सामाजिक संघटनेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रम ाची सुरुवात खासदार लंके यांच्या हस्ते पांडुरंगाच्या प्रतिकृतीस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर पंढरीच्या दिशेने निघालेल्या हजारो वारकऱ्यांसाठी अन्नदानाला प्रारंभ झाला आणि 'विठ्ठल नामाचा गजर' तसेच सेवाभावाच्या वातावरणात संपूर्ण परिसर भारावून गेला.

गेल्या ५ वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेल्या या सेवायज्ञाने यंदाही वारकऱ्यांच्या मनात वेगळे स्थान निम ाण केले. वारीच्या प्रवासात दमलेल्या भाविकांसाठी सकाळी गरमागरम वडा-पाव, बाटलीबंद पाण्याचे पाणी आणि वाफाळता चहा देण्याची व्यवस्था करण्यात आली. अनेक वारकऱ्यांनी दिंडीच्या प्रवासात प्रथमच गरमागरम वडा-पाव खायला मिळाल्याचे सांगत समाधान व्यक्त केले. सेवाभावाने दिलेले हे अन्न केवळ पोटाची भूक भागवणारे नसून माणुसकीची ऊब देणारे असल्याच्या भावना अनेक वारकऱ्यांनी व्यक्त केल्या. अन्नछत्राच्या उद्घाटनानंतर खासदार नीलेश लंके यांचे सहकारी आणि शेकडो स्वयंसेवक वारकऱ्यांच्या सेवेत तत्परतेने कार्यरत झाले. अन्नवाटप, चहा वितरण, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वारकऱ्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे अशी विविध कामे स्वयंसेवकांकडून केली जात होती. विशेष म्हणजे, खासदार लंके यांनीही प्रत्यक्ष सेवेत स्वतः ला झोकून दिले. पाण्याचे बॉक्स उतरविणे, साहित्याची ने आण करणे, परिसरातील कचरा गोळा करणे, स्वयंसेवकांना मदत करणे अशा विविध कामांमध्ये ते स्वतः सहभागी झाले. त्यामुळे उपस्थित वारकऱ्यांनी त्यांच्या या सेवाभावी वृत्तीचे कौतुक केले. वारकऱ्यांशी मनमोकळेपणाने संवाद साधत गरमागरम चहा आणि वडा पावचा आस्वाद घेतल्यानंतर वारकऱ्यांनी त्यांच्यासोबत फोटो, सेल्फी घेत आत्मीयतेने संवाद साधत त्यांच्या भावना जाणून घेतल्या. त्यामुळे अन्नछत्र परिसरात भक्ती, सेवा आणि आपुलकीचा संगम पाहायला मिळाला.

१९ ते २२ या चार दिवसांच्या कालावधीत हा सेवाभावी उपक्रम सुरू राहणार असून, या काळात लाखो वारकऱ्यांना अन्नदान, चहा, पिण्याचे पाणी तसेच आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. या चार दिवसीय उपक्रमादरम्यान खासदार निलेश लंके स्वतः परीते येथे उपस्थित राहणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. कोणत्याही प्रकारचा दिखावा किंवा औपचारिकता न ठेवता प्रत्येक वारकऱ्याला आपुलकीची वागणूक देण्याचा या उपक्रमातून केला जात आहे.

# महाबळेश्वरच्या विकासकामांना गती; दर्जेदार व वेळेत कामे पूर्ण करा - मंत्री मकरंद आबा पाटील

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२०, महाबळेश्वर (सातारा) :** आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटनस्थळ असलेल्या महाबळेश्वरच्या पायाभूत सुविधांचा दर्जा उंचावत विकासकामांना गती देण्याबरोबरच आपत्कालीन व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याच्या सूचना राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मा. मकरंद आबा पाटील यांनी दिल्या. हिरडा वन विश्रामगृह येथे विविध विकासकामे व आपत्कालीन सज्जतेसंदर्भात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीत महाबळेश्वरच्या मुख्य बाजारपेठेतील डॉ. साबणे रोड सुशोभीकरण प्रकल्पाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. हे काम उच्च दर्जाचे असून निर्धारित मुदतीत पूर्ण करण्यासाठी संबंधित यंत्रणांना मंत्र्यांनी स्पष्ट व कडक सूचना दिल्या. तसेच अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शहरातील नुकसानीचा आणि आपत्कालीन व्यवस्थापनाचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजनांवर भर देण्यात आला.




तापोळा रोड, एल. सी. डिसुझा रोड आणि क्षेत्र महाबळेश्वरकडे जाणाऱ्या मार्गांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश देताना मंत्री पाटील म्हणाले की, पर्यटन आणि स्थानिक नागरिकांच्या दृष्टीने हे रस्ते अत्यंत महत्त्वाचे असून पावसाचा विचार करून काम ांचा वेग वाढविणे आवश्यक आहे. वन विभागाच्या अखत्यारितील जागांमुळे विकासकामांमध्ये येणाऱ्या तांत्रिक अडचणी सकारात्मक समन्वयातून दूर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. नगरपरिषद आणि वन विभागाने एकत्रितपणे काम करून पर्यटक व नागरिकांची गैरसोय होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच ५ व ६ जुलैच्या अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे प्रस्ताव तातडीने शासनाकडे सादर करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले. बैठकीच्या प्रारंभी महाबळेश्वर गिरिस्थान नगरपरिषदेचे मुख्याधिकारी योगेश पाटील यांनी सुरू असलेल्या व नियोजित विकासकामांचे सादरीकरण केले. सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता शिवप्रसाद धुमाळ यांनी डॉ. साबणे रोड सुशोभीकरण प्रकल्पाची माहिती सादर केली.

यावेळी मंत्री मकरंद आबा पाटील म्हणाले, महाबळेश्वर हे राज्याचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे पर्यटनस्थळ आहे. त्यामुळे येथील सर्व विकासकामे उच्च दर्जाची व वेळेत पूर्ण झाली पाहिजेत. कामात कोणताही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही.

नगराध्यक्ष सुनील शिंदे यांनी सांगितले की, मंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाखाली महाबळेश्वर नगरपरिषद विकासकामे युद्धपातळीवर राबवत आहे. साबणे रोड सुशोभीकरण, अंतर्गत रस्ते आणि इतर विकासकामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करून पर्यटक आणि नागरिकांना उत्तम सुविधा देण्याचा आमचा निर्धार आहे. या बैठकीस नगराध्यक्ष सुनील शिंदे, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक राजेंद्र राजपुरे, माजी सभापती संजय गायकवाड, स्वच्छता सभापती संजय जंगम, बांधकाम सभापती अफझल सुतार, शिक्षण सभापती रोहित ढेबे, महिला व बालकल्याण सभापती संगीता वाडकर, वनपरीक्षेत्र अधिकारी महादेव मोहिते, वनपाल सुनील लांडगे, नगरसेवक-नगरसेविका, विविध विभागांचे अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, वन विभाग, पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी, प्रकल्प सल्लागार आणि ठेकेदार उपस्थित होते.

# बोगस पीक विमा काढल्यास शेतकरी पाच वर्षे ब्लॅकलिस्ट

**नंदकुमार बोरसे**

**शिरपूर :** सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगामापासून लागू करण्यात आली असून, यंदापासून ‘डिजिटल पीक सर्वेक्षण’ अनिवार्य करण्यात आले आहे. पीक विमा अर्जातील माहिती आणि डिजिटल पीक सर्वेक्षणातील नोंदीमध्ये तफावत आढळल्यास डिजिटल सर्वेक्षणातील नोंदच अंतिम मानली जाणार आहे. तसेच, जाणीवपूर्वक चुकीची माहिती देऊन बोगस पीक विमा काढल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित शेतकऱ्याला पीक विम्यासह कृषी विभागाच्या विविध योजनांमधून पाच वर्षांसाठी ब्लॅकलिस्ट करण्यात येणार आहे.

योजनेत पारदर्शकता वाढविणे, बोगस दावे रोखणे आणि पात्र शेतकऱ्यांनाच लाभ मिळावा, या उद्देशाने राज्य शासनाने सुधारित नियम लागू केले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी पीक पेरणीची माहिती अचूक भरून डिजिटल पीक सर्वेक्षणात योग्य नोंद करून घेण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

> सुधारित प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा जास्ती जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा. माहिती भरताना पारदर्शक भरावी.काही अडचण असल्यास कृषी विभागाशी संपर्क करावा.
>
> **- कैलास गोपाळ तालुका कृषी अधिकारी-शिरपुर**

**कोणत्या पिकाला किती मुदत?**

खरीप व रब्बी हंगामासाठी सुधारित योजना लागू करण्यात आली आहे. खरीप पीक विमा अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ जुलै पर्यंत आहे. तर रब्बी पिकासाठी वेगवेगळी तारीख निश्चित करण्यात आली आहे.मुदतीपूर्वी अर्ज व आवश्यक कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.

**‘डिजिटल पीक सर्वेक्षण’सह या गोष्टी अनिवार्य!**

डिजिटल पीक सर्वेक्षणात पिकाची नोंद करणे.आधार क्रमांक संलग्न करणे.

बँक खाते व मोबाईल क्रमांक अद्ययावत असणे.तसेच आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज करणे गरजेचे आहे.

**योजनेतील इतर प्रमुख बदल असे!**

डिजिटल नोंदींना अधिकृत मान्यता.

बोगस अर्जांवर कठोर कारवाई.

दावा पडताळणी अधिक पारदर्शक.

तांत्रिक माध्यमातून पडताळणीला प्राधान्य.

**तफावत आढळल्यास सर्व्हेतील नोंदच अंतिम!**

पीक विमा अर्जातील पीक आणि डिजिटल पीक सर्वेक्षणातील पीक यामध्ये फरक आढळल्यास डिजिटल पीक सर्वेक्षणातील माहितीच अंतिम ग्राह्य धरली जाणार आहे.

**गैरप्रकार केल्यास पाच वर्षांसाठी ब्लॅकलिस्ट!**

चुकीची माहिती देणे, बनावट कागदपत्रे सादर करणे किंवा बोगस दावा केल्याचे सिद्ध झाल्यास संबंधित शेतकऱ्याला पाच वर्षांसाठी पीक विमा तसेच ‘नमो शेतकरी महासन्मान’सह कृषी विभागाच्या विविध योजनांमधून अपात्र करण्यात येणार आहे.

**कुठल्या पिकांसाठी किती हप्ता?**

खरीप पिके – विमा रकमेच्या २ टक्के

रब्बी पिके – १.५ टक्के

वार्षिक नगदी/व्यावसायिक व फळपिके – ५ टक्के असे वर्गीकरण करण्यात आले आहे.

# वृक्षदिंडीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश; ‘एक पेड माँ के नाम’ उपक्रम उत्साहात

**नंदकुमार बोरसे**

**शिरपूर :** शिरपूर तालुक्यातील किसान विद्या प्रसारक संस्था संचलित क्रांतिवीर शंकर पांडू माळी माध्यमिक विद्यालय वरवाडे ,शिरपूर आमोदा येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आज वृक्षदिंडी व ’एक पेड माँ के नाम’ या उपक्रमाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. तुषार रंधे, सचिव निशांत रंधे, खजिनदार आशाताई रंधे व मुख्याध्यापिका के. एस. ईशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा शालेय उपक्रम पार पडला. यामध्ये विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर बंधू-भगिनी तसेच विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

विद्यालयापासून आमोदा येथील महादेव मंदिर परिसरापर्यंत वृक्षदिंडी काढण्यात आली. आकर्षक पद्धतीने सजविलेल्या पालखीसह विद्यार्थ्यांनी झाडे लावा, झाडे जगवा, वृक्ष वाचवा, पर्यावरण वाचवा, एक पेड माँ के नाम अशा घोषणा देत पर्यावरण जनजागृती केली. बँडच्या तालावर लेझीम व झांज पथकाच्या आकर्षक सादरीकरणामुळे संपूर्ण परिसर उत्साहाने दुमदुमून गेला.



यानंतर ‘एक पेड माँ के नाम’ या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांच्या आईंच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. आपल्या आईच्या हस्ते वृक्ष लावण्याचा अनोखा अनुभव विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरला. या उपक्रमातून मातृप्रेम, पर्यावरण संवर्धन आणि वृक्षसंवर्धनाचा संदेश प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी निसर्गरम्य वातावरणात वनभोजनाचा आनंद घेतला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका के. एस. ईशी,सर्व शिक्षक, शिक्षकेतर बंधू-भगिनी, विद्यार्थ्यांच्या माता तसेच विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या उपक्रमातून प्रत्येकाने किमान एक वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प केला आणि पर्यावरण संवर्धनाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित केली.

# केमिकल सोडणाऱ्या नराधमांवर कठोर कारवाई कधी? पाटणकरांचा सवाल !

**सुरेश संकपाळ**

**पाटण :** गेल्या पाच दिवसापूर्वी रात्रीचे कोयना नदीच्या पात्रात कोणीतरी अज्ञात व्यक्तीने घातक रसायनयुक्त केमिकल सोडल्याने संपूर्ण पाटण शहरात एकच खळबळ उडाली होती. नदीच्या पाण्याला फेस येणे, रंग बदलणे आणि दुर्गंधी येण्याने पाणी विषारी झाले का? पिण्याने कावीळ, किडनी फेल होणार का? अशी भीती पाटण शहरातील नागरिकात पसरली होती.

या पार्श्वभूमीवर नगरपंचायतीने आणि आरोग्य विभागाने तात्काळ पाण्याचे नमुने घेऊन सरकारी प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले होते. आता त्याचा अहवाल आला असून कोयना नदीचे पाणी शुद्धीकरणानंतर पिण्यायोग्य आहे असा दिलासादायक अहवाल प्राप्त झाला आहे. त्यामुळे पाटण शहरातील नागरिकांची मोठी काळजी मिटली असली तरी, नदीत विष सोडणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी संतप्त मागणी पाटण शहरातील नागरिक करत आहेत.

पाच दिवसांपूर्वी रात्रीचे पिण्याच्या पाण्याच्या जॅकवेल जवळ तामकडे हद्दीत पाण्यावर काळपट रंग दिसून आला. पाण्याला तीव्र केमिकलचा वास येत होता त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली.

ही बातमी वाऱ्यासारखी पसरताच नागरिकांनी थेट नगरपंचायतीवर धाव घेतली. सोशल मीडियावर पाणी पिऊ नका असे मेसेज व्हायरल झाले होते.

परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा विभागाने आणि तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी तात्काळ ३ ठिकाणाहून पाण्याचे नमुने घेतले.जॅकवेल पॉईंट, फिल्टर हाऊस इनलेट, शहरातील नळाचे पाणी,

हे नमुने प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कराड प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले होते.काल सकाळी प्राप्त झालेला अहवाल

पिण्यायोग्य आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये, पाणी उकळून आणि गाळून प्यावे.

हा अहवाल येताच नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.पण गुन्हेगार मोकाटच आहे पाटणकरांचा संताप कायम आहे. पाणी पिण्यायोग्य असले तरी प्रश्न संपलेला नाही. नदीत केमिकल कोणी सोडले? हा गंभीर गुन्हा आहे.

त्यामुळे पाटण शहरातील नागरिकांनी या घटनेचा तीव्र निषेध केला आहे. कोयना नदीचे पाणी सध्या सुरक्षित असले तरी या घटनेने पाटणच्या पाणी सुरक्षेचा मोठा प्रश्न समोर आणला आहे. प्रशासन आता केमिकल माफियांना शोधून कठोर कारवाई करते का, याकडे संपूर्ण पाटण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# पोंभूर्णा तालुक्यात धान, कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे शेतकरी प्रशिक्षण संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**पोंभुर्णा (चंद्रपूर) :** केंद्र पुरस्कृत कापूस उत्पादकता वाढ (कपास क्रांती) अभियान २०२६-२७ अंतर्गत कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादनात व उत्पादकतेत वाढ करण्याच्या उद्देशाने मौजा देवई, भिमनी व चेक खापरी येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. तसेच राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान’ अंतर्गत धान उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादनात व उत्पादकतेत वाढ करण्याच्या उद्देशाने मौजा भिमनी, बोर्डा बोरकर व सातारा भोसले येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला. राष्ट्रीय खादयतेल अभियान तेलबिया अंतर्गत सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादनात व उत्पादकतेत वाढ करण्याच्या उद्देशाने मौजा चक आष्टा येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात आला.




प्रशिक्षणात तज्ञांनी कापूस, धान व सोयाबीन पिकातील आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन, संतुलित खत व्यवस्थापन, कार्यक्षम पाणी व्यवस्थापन, तण व्यवस्थापन, कमीत कमी रासायनिक घटकांचा वापर करून सेंद्रिय घटकांचा अधिकाधिक समावेश, तसेच लागवडीपासून काढणी पर्यंतच्या शास्त्रशुद्ध पीक व्यवस्थापनाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करून उत्पादन खर्च कमी करत गुणवत्तापूर्ण व अधिक उत्पादन घेण्याचे आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद तालुका कृषी अधिकारी श्रीमती स्वाती ढोबळे यांनी भूषवले. तालुक्यात कापूस, धान व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अद्ययावत तंत्रज्ञानाची माहिती, शास्त्रशुद्ध पीक व्यवस्थापन आणि उत्पादनवाढीसाठी आवश्यक मार्गदर्शन सातत्याने उपलब्ध करून दिले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मंडळ कृषी अधिकारी श्री. गणेश गवळी यांनी कपास क्रांती अभियानाची, राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान’ व राष्ट्रीय खादयतेल अभियान तेलबियाची उद्दिष्टे, विविध उपक्रम तसेच शेतकऱ्यांनी अवलंबावयाच्या तांत्रिक बाबींची सविस्तर माहिती दिली.

या प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी, ग्राम पंचायतीचे पदाधिकारी, प्रगतशील शेतकरी तसेच परिसरातील मोठ्या संख्येने कापूस, धान व सोयाबीन उत्पादक शेतकरी उपस्थित होते. या प्रशिक्षणाद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक, शाश्वत व शास्त्रशुद्ध शेती पद्धतींचा अवलंब करून कापूस उत्पादन आणि उत्पादकता वाढविण्यासाठी उपयुक्त मार्गदर्शन करण्यात आले. व कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## थोडक्यात बातम्या

### मुंबईत रंगणार कलगी तुराचा जंगी सामना - नवोदित शाहीर आमने सामने

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२०, मुंबई :** कोकणातील पारंपरिक लोककला कलगी तुरा जतन आणि संवर्धन हेतू कलगी तुरा समाज उन्नती मंडळ-मुंबई संस्थेच्या वतीने गुरुवार, दिनांक ३० जुलै २०२६ रोजी रात्री ठीक ०८.०० वाजता,मा. दीनानाथ मंगेशकर नाट्यगृह,विलेपार्ले, मुंबई येथे भव्य जंगी सामनाचे आयोजन करण्यात आले आहे. आशिष शेलार सांस्कृतिक कार्य मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. दरम्यान नावाजलेल्या घराण्यातील नवोदित शाहीरांची जुगलबंदी या कलगी तुऱ्याच्या जंगी सामन्यात कलगीवाले शाहीर: अमर फटकरे आणि तुरेवाले शाहीर, सुनिल गोताड हे दोन नवोदित शाहीर आपली कला सादर करणार आहेत.

संस्थेच्या उन्नतीसाठी आयोजित या कार्यक्रमाला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अधिक माहितीसाठी: ८८५००९९०९० / ७०२१४५२३०५ / ९३२४९७१०८१ / ९२२१२००५०१ / ९०८२४८१०७९ या मोबाईल नंबरवरती संपर्क साधवा असे आवाहन कलगी तुरा समाज उन्नती मंडळ-मुंबई वतीने अध्यक्ष सुरेश ऐनारकर, सचिव संतोष धारशे यांनी केले आहे.

### मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त आज गोंडपिपरीत भव्य महाआरोग्य व मोफत शस्त्रक्रिया शिबिर



**अक्षराज : संतोष बांदूरकर**

**दि.२०, गोंडपिपरी (चंद्रपूर) :** राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्य राजुरा विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवरावदादा भोंगळे यांचे संकल्पनेतून मंगळवार, दि.२१ जुलै २०२६ रोजी गोंडपिपरी येथील कला व वाणिज्य महाविद्यालयात भव्य महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये जवळपास सर्वच प्रकारच्या आजारांचे निदान, उपचार व शस्त्रक्रिया निःशुल्कपणे करून देण्यात येणार आहेत. अशी माहिती आयोजक म्हणून भारतीय जनता पार्टीच्या वतीने देण्यात आली आहे.

सदर शिबीर सकाळी १० वाजेपासून ते दुपारी ०३ वाजेपर्यंत सुरू राहणार असून याठिकाणी शालिनी मेघे हॉस्पिटल अँन्ड रिसर्च सेंटर वानाडोंगरी येथील मेडिसीन, नेत्ररोग, सर्जरी, बालरोग, स्त्रीरोग, कान - नाक - घसा, अस्थिरोग, त्वचारोग कॅन्सर आणि दंत तपासणी यांसारख्या रोगांवरील तज्ज्ञ डॉक्टरांची टीम उपस्थित राहणार असून याठिकाणी सर्व चाचण्या मोफत करून देण्यात येणार आहे. त्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून नागरिकांनी जवळच्या भाजपा जनसंपर्क कार्यालयात जाऊन तसेच नजिकच्या भाजपा पदाधिकाऱ्यांकडे आपल्या नावाची नोंद करावी आणि शिबिरात येताना आधारकार्ड व केशरी किंवा पिवळे रेशनकार्ड सोबत आणावे, असेही आवाहन. आ.मासुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्र तथा आ. देवरावदादा भोंगळे यांचे भाजपा जनसंपर्क कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

### आषाढी यात्रेत खाजगी दवाखाने बंद ठेवल्यास होणार कारवाई

### उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांचे कडक आदेश



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२०, पंढरपूर :** आषाढी एकादशी यात्रेसाठी लाखो वारकरी पंढरपुरात दाखल होत असताना भाविकांच्या आरोग्याची कोणतीही गैरसोय होऊ नये. यासाठी प्रशासनाने मोठा निर्णय घेतला आहे. यात्रा कालावधीत कोणतेही खाजगी दवाखाने, रुग्णालये, क्लिनिक अथवा नर्सिंग होम बंद ठेवता येणार नाहीत, तसेचडॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचारी यांनी पंढरपूर शहर सोडू नये, असे स्पष्ट आणि कडक आदेश उपविभागीय दंडाधिकारीसचिन इथापेयांनी जारी केले आहेत.

आषाढी एकादशीचा मुख्य सोहळा दि.२५ जुलै रोजी पार पडणार असून १५ ते २९ जुलैया संपूर्ण यात्रा कालावधीत पंढरपूर शहर व परिसरात लाखो भाविकांची गर्दी अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर आपत्कालीन आरोग्य सेवा अखंड सुरू राहणे अत्यावश्यक असल्याने आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ अंतर्गत हे आदेश लागू करण्यात आले आहेत.

आदेशानुसार पंढरपूर शहर व परिसरातील सर्व खाजगी दवाखाने, रुग्णालये, क्लिनिक आणि नर्सिंग होम यांनी नियमित वेळेत सेवा सुरू ठेवणे बंधनकारक आहे. कोणत्याही कारणास्तव आरोग्यसेवा बंद ठेवता येणार नाही. आपत्कालीन रुग्णांना तातडीने उपचार देण्याची जबाबदारी संबंधित संस्थांवर राहणार आहे. यात्रा काळात आवश्यकतेनुसार डॉक्टर, परिचारिका आणि वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध ठेवण्याबरोबरच पुरेसा औषधसाठा, आपत्कालीन उपचार साहित्य आणि आवश्यक सुविधा कार्यरत ठेवण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत.

वारकऱ्यांना वेळेत उपचार मिळावेत, यासाठी आरोग्य यंत्रणा पूर्ण क्षमतेने कार्यरत ठेवण्यावर भर देण्यात आला आहे. यात्रा संपेपर्यंत वैद्यकीय सेवा देणारे डॉक्टर, परिचारक व संबंधित कर्मचारी यांनीपंढरपूर शहर सोडू नये, असे स्पष्ट निर्देश आदेशात नमूद करण्यात आले आहेत.

कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तत्काळ वैद्यकीय मदत उपलब्ध व्हावी, हा या निर्णयामागील प्रमुख उद्देश आहे. प्रशासनाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या संस्था किंवा व्यक्तींविरुद्धआपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५तसेच इतर लागू कायद्यांनुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही उपविभागीय दंडाधिकारीसचिन इथापेयांनी दिला आहे.

**आषाढी यात्रेत लाखो भाविकांच्या जीविताची सुरक्षा आणि वेळेत वैद्यकीय सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी प्रशासनाने घेतलेला हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात असून,वारकऱ्यांच्या आरोग्याशी कोणतीही तडजोड होणार नाहीअसा स्पष्ट संदेश या आदेशातून देण्यात आला आहे.**